महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.


==== =============================================================================

जा.क्र.तंशिविकापू/विवि/स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन/२०२०-२१/ ०९ — दिनांक : 05 JAN 2021

प्रति,
प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त,
सर्व पदवी / पदव्युत्तर अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्था,

विषय :-प्रत्येक तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करणे आणि समन्वयक नियुक्त करणेबाबत..

संदर्भ :- मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र २अ/एडीएम/स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन/२०२०/३५५ दि. ११/१२/२०२०

उपरोक्त विषयास अनुसरुन केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या प्रशासकीय सेवापूर्व परीक्षेमध्ये महाराष्ट्रातील मुलांचे प्रमाण वाढावे यासाठी पूर्ण राज्यात एकूण ०६ प्रशासकीय सेवापूर्व परीक्षा प्रशिक्षण केंद्र शासनाने सुरु केली आहेत. यामध्ये संबंधित विषयाच्या तज्ञांकडून प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. या केद्रमध्ये ५४० विद्यार्थ्यांना विनामुल्य प्रशिक्षण देण्यात येते, व दरमहा शिष्यवृत्तीही दिली जाते. मागील काही वर्षातील अनुभव पाहता सदर केंद्रामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी परीक्षा देणा-या मुलांची संख्या वाढली आहे, परंतू किमान गुणही अनेक मुले मिळवू शकत नाही असे दिसून येते. यासंदर्भात मुलांना उचित मार्गदर्शन मिळणे अत्यत आवश्यक आहे.

महाराष्ट्रात असणा-या भारतीय प्रशासकीय सेवापूर्व केद्राची माहिती विद्यार्थ्यांना देणे, केद्रीय लोकसेवा आयोगामार्फत आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगार्मात आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या परीक्षांची माहिती विद्यार्थ्याना देणे , सदर परीक्षांसाठी त्यांना प्रोत्साहित करणे, जास्तीत जास्त मुलांसाठी फार्म भरला जाईल यासाठी पाठपुरावा करणे, भारतीय सेवा परीक्षेची तयारी करण्यासाठी योग्य मार्गदर्शन करणे, शासनाद्वारे स्थापन केलेल्या परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश परीक्षेसाठी मार्गदर्शन करणे, इ. सर्व कामे करण्यासाठी नव्याने सेवेत आलेलया व योग्य मार्गदर्शन करु शकणा-या सहाय्यक प्राध्यापकाची समन्वयक म्हणून नेमणूक करावी. जेणेकरुन त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्याना अनेक वर्ष लाभ मिळू शकेल. **सदरची माहिती गुगल फार्मवर भरुन दिनांक ०५/०१/२०२१ सायंकाळी ०५:०० वाजे पर्यत सादर करावी**

(डॉ.डि.व्हि.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत : संदर्भिय पत्र

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन/ २०२०/३५५ दिनांक : 11 DEC 2020

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, शासन अनुदानीत,
विनाअनुदानीत तांत्रिक व्यावसायिक
पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय : प्रत्येक तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करणे आणि समन्वयक नियुक्त करणे

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या प्रशासकीय सेवापूर्व परीक्षेमध्ये महाराष्ट्रातील मुलांचे प्रमाण वाढावे यासाठी महाराष्ट्र शासन संपूर्ण राज्यात सर्वतोपरी प्रयत्न करीत असून पूर्ण राज्यात अशी ०६ भारतीय प्रशासकीय सेवापूर्व परीक्षा प्रशिक्षण केंद्र शासनाने सुरू केलेली आहेत. यात संबंधित विषयाच्या तज्ज्ञांकडून प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. सदर प्रशिक्षण केंद्रामधून दरवर्षी सुमारे ५४० मुलांना विनामुल्य प्रशिक्षण देण्यात येते, शिवाय त्यांना मासिक खर्चासाठी दरमहा शिष्यवृत्तीही दिली जाते. मागील काही वर्षातील अनुभव पाहता सदर केंद्रामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी परीक्षा देणा-या मुलांची संख्या वाढली आहे, परंतू किमान गुणही अनेक मुले मिळवू शकत नाही असे दिसून येते. यासंदर्भात मुलांना उचित मार्गदर्शन मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्रात असणा-या भारतीय प्रशासकीय सेवापूर्व केंद्राची माहिती विद्यार्थ्यांना देणे, केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या परीक्षांची माहिती विद्यार्थ्यांना देणे, सदर परीक्षांसाठी त्यांना प्रोत्साहित करणे, जास्तीत जासत मुलांसाठी फॉर्म भरला जाईल यासाठी पाठपुरावा करणे, भारतीय सेवा परीक्षेची तयारी करण्यासाठी योग्य मार्गदर्शन करणे, शासनाद्वारे स्थापन केलेल्या परीक्षा केंद्रांमध्ये प्रवेश परीक्षेसाठी मार्गदर्शन करणे, इ.सर्व कामे करण्यासाठी नव्याने सेवेत आलेल्या व योग्य मार्गदर्शन करु शकणा-या सहाय्यक प्राध्यापकाची समन्वयक म्हणून नेमणूक करावी. जेणेकरुन त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना अनेक वर्ष मिळू शकेल. नेमणूक आदेशाची प्रत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय तसेच संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव यांना देण्यात यावी.

सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये यांनी त्यांच्या विभागातील संस्थांकडून उपरोक्त सूचनांची अंमलबजावणी होण्याबाबत पाठपुरावा करावा व संस्थेमध्ये समन्वयक नियुक्त करण्यात आले आहेत याबाबतची माहिती संचालनालयास सादर करावी.

सदर सूचना विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी असून केंद्रीय लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेमार्फत घेण्यात येणा-या परीक्षांमध्ये महाराष्ट्रातील अधिकाधिक विद्यार्थी यशस्वी व्हावेत या उद्देशाने देण्यात येत आहेत. सदर समन्वय पदासाठी कोणतेही मानधन अथवा विशेष वेतन लागू होणार नाही.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

१. मा.स्वीय सहाय्यक ,मंत्रीमहोदय,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई ३२
२. मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई ३२

प्रत : माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी

१. मा.कुलसचिव,सर्व अकृषि विद्यापीठे- त्यांना विनंती करण्यात येते की, केंद्रीय लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेमार्फत घेण्यात स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी योग्य त्या सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना देण्यात याव्यात.
२. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती, नागपूर- त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर संस्थांच्या निदर्शनास आणण्यात यावे.